महाराष्ट्र शासन
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी (महाराष्ट्र)
प्रशासकीय ईमारत, वसमत रोड, परभणी–431402
कुलसचिव कार्यालय

सत्यमेव जयते

ईमेल : reg_mau@redifmail.com
संकेतस्थळ : www.vnmkv.ac.in

दुरध्वनी (02452) 229755
फॅक्स: (02452) 229755,223582

जा.क्र.२०२३/साप्रवि-२/5105

दिनांक १७.११.२०२३ 20

**वाचा :** महाराष्ट्र शासननिर्णय क्र.संकिर्ण ८२२१/प्र.क्र.४५९/सां.का.४ दिनांक २४.०७.२०२३

**परिपत्रक**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णयानूसार शिवकालीन मंगल चिन्हे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम शौर्य अधोरेखीत करणा-या परिशिष्ट अ मध्ये सुनिश्चीत केलेल्या विशेष बोधचिन्हाचा सर्व कार्यालयीन पत्रव्यवहारांत कटाक्षाने वापर करावा तसेच आपल्या कार्यालयात दर्शनी भागात सदर बोधचिन्ह चित्रित करावे.

**मा.कुलगुरू महोदय, यांच्या मान्यतेने,**

(पु.को.काळे) 17.11.23
कुलसचिव

**प्रतिलीपी :-**
मा.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) / संचालक संशोधन / संचालक विस्तार शिक्षण /सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) / विद्यापीठ अभियंता /नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांना कार्यवाहीस्तव देवुन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय प्रमुख / अधिकारी, कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देवुन संदर्भीय शासन निर्णयानूसार कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे.

**प्रत :-**
१.प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
२.मा.कुलगुरू महोदय, यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव.

SA 1

"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शासकीय कार्यक्रम व शासकीय पत्रव्यवहारावर बोधचिन्ह वापरण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र. ४५९/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ जुलै, २०२३

**प्रस्तावना :-**

"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या विशेष बोधचिन्हाचे लोकार्पण करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा जागर पुन्हा मराठी मनांमनात व्हावा, जगभरात जेथे जेथे मराठी माणूस आहे तेथे या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तसेच त्यांच्याबद्दलची माहिती पोहोचावी हा या मागील उद्देश आहे. त्यानुषंगाने, राज्य सरकारच्या माध्यमातून वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारात सदर बोधचिन्हाचा (Logo) वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या परिशिष्ट - "अ" मध्ये सुनिश्चित केलेल्या विशेष बोधचिन्हाचा (Logo) शासनाच्या सर्व शासकीय कार्यक्रमाच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारांत कटाक्षाने वापर करण्यात यावा. तसेच, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर्शनी भागात सदर बोध्दचिन्ह चित्रित करण्यात यावे. सर्व मंत्रालयीन/प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांना सदर बाब निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत योग्य त्या सूचना प्रसारीत कराव्यात.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७२४१७३५५५७९२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VILAS RAMRAO THORAT

Digitally signed by VILAS RAMRAO THORAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURIS AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae57103a0cfb9a57fc6ce6, postalCode=400032, st=Maharasht serialNumber=CB03C92B399CC89310BF1378C184D97A4B7 98E926EA8E71DD7BC9CB273631, cn=VILAS RAMRAO THOF
Date: 2023.07.24 17:39:00 +05'30'

**(विलास रा. थोरात)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, विधान परिषद, विधान मंडळ, मुंबई
३. मा. अध्यक्ष, विधानसभा, विधान मंडळ, मुंबई

481

शासन निर्णय क्र. संकीर्ण-८२२३/ प्र.क्र.४५९/सां.का.४, दिनांक २८ जुलै, २०२३ सोबतचे

"परिशिष्ट - अ"

